जिल्हा परिषद अंतर्गत अस्थायी कर्मचा-
यांना स्थायित्व प्रमाणपत्र उपलब्ध करुन
देणेबाबत. संवर्ग- विस्तार अधिकारी (कृषि)

अहिल्यानगर जिल्हा परिषद
कृषि विभाग
जि.प.आदेश क्र.कृषि/आस्था २/२००/२०२६
अहिल्यानगर दिनांक ~~स्वाक्षरीखाली नमूद केलेनुसार~~ ०७/०७/२०२६

वाचा:- १. महाराष्ट्र शासन साप्रविकडील परिपत्रक क्र.स्थाप्रप-१४१४/प्र.क्र.७३/१३ अ
दि.११/९/२०१४

महाराष्ट्र शासनाचे संदर्भीय निर्णय/परिपत्रकात नमुद केलेनुसार प्रत्येक अस्थायी शासकीय कर्मचा-यास/अधिका-यास स्थायित्व प्रमाणपत्र प्रथम पदावरील नियुक्तीच्या संदर्भात देणे आवश्यक असल्याने स्थायित्व प्रमाणपत्र देण्यासंदर्भात पुढील सुचना दिलेल्या आहेत.

१.प्रथम नियुक्तीच्या पदावर ३ वर्षाची नियमित सेवा पुर्ण करणा-या व पुढील शर्तीची पुर्तता करीत असलेल्या अस्थायी शासकीय कर्मचा-यांपैकी गट -अ व गट -ब (राजपत्रित)अधिका-यांच्या बाबतीत सबंधित नियुक्ती प्राधिका-याने, तसेच गट -ब (अराजपत्रित) गट-क व गट ड कर्मचा-यांच्या बाबतीत सबंधित कार्यालय प्रमुखाने स्थायित्व प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. त्याबाबत खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

(१) कर्मचा-यांची नियुक्ती सेवा प्रवेश नियमानुसार व विहित पध्दतीने होणे

(२) कर्मचारी सेवेस पात्र असल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र असणे व कर्मचा-याने सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परिक्षा उत्तीर्ण होणे

(३) कर्मचा-यांचा सेवाभिलेख (उदा.गोपनीय अहवाल, उपस्थिती ,सचोटी इ.) चांगला असणे

याव्दारे प्रमाणित करणेत येते की,उक्त शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक दि.११ सप्टेबर २०१४ मधील सुचना क्र.२ येथे विनिर्दिष्ठ करण्यात आलेल्या सर्व शर्ती खाली नमूद करण्यात आलेल्या अस्थायी शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत पुर्ण झालेल्या आहेत आणि त्यानुसार ते कर्मचारी आवश्यक त्या सर्व प्रयोजनार्थ त्यांच्या नावासमोर स्तंभ-३ मध्ये नमूद केलेल्या पदावर स्तंभ ५ मध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून स्थायी शासकीय कर्मचारी म्हणून समजले जाण्यास पात्र आहेत.

| अ.क्र | शासकीय कर्मचा-याचे नाव व त्याचे पदनाम | ज्य पदावर स्तंभ क्र.१ मधील कर्मचा-यास स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात येते त्या पदाचे पदनाम | नियुक्तीचा दिनांक | कोणत्या दिनांका पासून स्थायीत्व प्रमाणपत्र देण्यात आले | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री सुरज मनिराम चव्हाण | विस्तार अधिकारी (कृषि) | ०९/०२/२०१५ | ०९/०२/२०१८ | |

Scanned with OKEN Scanner

वरील प्रमाणे विस्तार अधिकारी (कृषि) यांना विस्तार अधिकारी (कृषि) या पदावर ३ वर्षाची नियमित सेवा पुर्ण करणा-या पात्र अस्थायी कर्मचा-यांना व वर नमूद केलेल्या अटी पूर्ण करणा-या कर्मचा-यांना स्थायीत्व प्रमाणपत्र देणेत येत आहे. सदर प्रमाणपत्राची नोंद सबंधित कर्मचा-यांचे मुळ सेवापुस्तकात घेणेपुर्वी वरील अटी व शर्तीची शहानिशा कार्यालय प्रमुख यांनी सबंधिताचे मुळसेवापुस्तकावरुन करुन घेणेत यावी व त्यानंतरच सदर प्रमाणपत्राची नोंद घेण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडेस सादर करावा.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेला आहे. त्याचा संकेतांक क्रमांक 20260707010014 असा आहे.

Digitally signed by
Sudhir Balasaheb Shinde
Date: 01-07-2026
15:43:52

**कृषि विकास अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

प्रत:- सबंधित विस्तार अधिकारी
व्दारा गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले

प्रत:-१. मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जिल्हा परिषद अहिल्यानगर
२.गट विकास अधिकारी पंचायत समिती अकोले

Scanned with OKEN Scanner